|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office — जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.०१**

जळगाव दि. २३ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व प्रवेशपूर्व परीक्षेतून सूट प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक निश्चितीच्या प्रक्रियेच्या तिसऱ्या दिवशी ९९ विद्यार्थ्यांना मार्गदर्शक प्राप्त झाले.

आज दि.२३ मे रोजी विज्ञान व तंत्रज्ञान व आंतरविद्याशाखा या दोन विद्याशाखांमधील पुढील विषयांना मार्गदर्शक देण्यात आले. उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक प्राप्त झाले. कंसामध्ये मार्गदर्शक देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या नमूद करण्यात आली आहे. भौतिकशास्त्र (१९), इलेक्ट्रॉनिक्स सायन्स (०८), शिक्षणशास्त्र (३४), शारीरिक शिक्षणशास्त्र (१०), जनसंवाद व पत्रकारिता (०३) डॉ.आंबेडकर विचारधारा (०३), ग्रंथालय व माहितीशास्त्र (१४), विधी (०८) प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी बुधवारी या प्रक्रियेच्या ठिकाणी भेटी देवून विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

उद्या गुरुवार, दि.२४ मे रोजी गणित, संख्याशास्त्र आणि कॉम्प्युटर सायन्स व इन्फॉर्मेशन टेक्नॉलाजी या विषयांसाठी मार्गदर्शक निश्चितीची प्रक्रिया होणार असल्याची माहिती संशोधन विभागाचे उपकुलसचिव जी.एन.पवार यांनी दिली.

---

**बातमी क्र.०२**

जळगाव दि. २३ (प्रतिनिधी):- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थिनी व महिलांसाठी जळगाव शहरातील निधी फाऊंडेशनच्या वतीने सॅनेटरी वेडिंग मशिन व इन्सीलेटर भेट म्हणून देण्यात आले.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यापीठातील विद्यार्थिनी व महिलांच्या सोयीसाठी काही पाऊले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून निधी फाऊंडेशनच्या अध्यक्षा वैशाली विसपूते यांनी सामाजिक बांधिलकी दर्शवित महिलांसाठी सॅनेटरी वेडिंग मशिन व इन्सीलेटर विद्यापीठाला मोफत दिले. यावेळी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, दीपक पाटील, निधी फाऊंडेशनच्या अध्यक्षा वैशाली विसपुते, सचिव सुर्यकांत विसपूते, यश विसपुते, प्रज्ञा टोणगांवकर, वैशाली शर्मा, पुष्पा पाटील, मृणालिनी चव्हाण, साधना पटाव, ज्योती कोल्हे, चित्रा कोळी व आशा पाटील उपस्थित होते.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय/२०१८ — दिनांक : २३ मे, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी